# VASANTRAO NAIK MARATHWADA KRISHI VIDYAPEETH, PARBHANI (M.S.)

## TENDER DOCUMENT

## e-Tendering System

## FOR THE WORK OF

Providing Contractual Labour (Mazdoor), Driver and Office assistant at College of Agriculture ,Golegaon VNMKV, Parbhani

for the year 2022-23 & 2023-24

**Earnest Money Deposit**: Rs. 40,000/-

Website :-https://mahatenders.gov.in

**Associate Dean and Princpal**
College of Agriculture ,Golegaon
**Vasantrao Naik Marathwada Krishi Vidyapeeth**
**Parbhani (M.S.)-431402**

**For The Work Of**

Providing Contractual Labour (Mazdoor), Driver and Office assistant at College of Agriculture ,Golegaon VNMKV, Parbhani for the year 2022-23 & 2023-24

**INDEX**


| Sr. No. | Chapter | Page No. |
|---|---|---|
| 1. | Brief Tender Notice. | |
| 2. | General Information of Contract and Tender Schedule | |
| 3. | Detailed Tender Notice | |
| 4. | General description of Work and site Location and Contractor's Declaration. | |

# E-TENDER NOTICE NO: 01/22-23 FOR THE YEAR 2022-23

## VASANTRAO NAIK MARATHWADA KRISHI VIDYAPEETH, PARBHANI

Online e-tender in form for the following work are invited by College of Agriculture ,Golegaon, Vasantrao Naik Marathwada Krishi Vidyapeeth Parbhani (M.S.) Mobile No. 7588156246 E-mail: adpgolegaon@gmail.com on Government of Maharashtra Electronic Tender Management System https://mahatenders.gov.in

Online bids are invited for the following works /services from **04/08/2022** at **10.00** hours. The details can be viewed and downloaded online directly from the Government of Maharashtra e-Tendering Portal https://mahatenders.gov.in **from 04/08/2022 at 10.00 to 11/08/2022** at **23.00** hours (IST) onwards.

| Sr. No. | Name of work | Estimated cost in (Rs.) | System generated tender | Time limit for completion (months) | Cost of Blank tender form (Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Labour (Mazdoor) | | | 12 months from approval of tender | 2000/- |
| 2 | Driver | | | | |
| 3 | Office Assistant | | | | |

For more details on the tender and bidding process you may please visit the above mentioned portal.

NOTE:

1. All eligible/interested bidders are mandated to get enrolled on e-Tendering portal (https://mahatenders.gov.in)
2. To process the tenders online, to encrypt their bid and to sign the bid hashes, bidders are required to obtain digital certificate. For details bidders be contact Help Desk.
3. Bidder can contact Help Desk for any clarification of their doubts regarding the process of Electronic Tendering System. Help Desk at through Email ID eproc.support@maharashtra.gov.in.
4. Tender fees non-refundable and EMD should be paid online only through **Debit card / Credit Card / Net Banking / RTGS / NEFT.** If the tender fees and EMD is not credited in above accounts as time specified in key schedule the tender will be summarily rejected. If the offer is below, If the tenderer fails to submit below amount FDR, the tender will be rejected and EMD will be forfeited.

**Associate Dean and Princpal**
College of Agriculture ,Golegaon
**Vasantrao Naik Marathwada Krishi Vidyapeeth**
**Parbhani 431401 (M.S)**

# VASANTRAO NAIK MARATHWADA KRISHI VIDYAPEETH PARBHANI

## E-TENDER NOTICE NO. 01/2022-23

Sealed e-tenders in the following work invited by the Associate Dean and Principal, College of Agriculture, Golegaon, Vasantrao Naik Marathwada Krishi Vidyapeeth, Parbhani Mobile No. 7588156246 from Registerd Contractors in appropriate Class with Government of Maharashtra. Tender Notice is available on https://mahatenders.gov.in )

| Sr. No. | Name of work | Estimated cost in (Rs.) | Earnest money in (Rs.) | Cost of Blank tender form (Rs.) | Time limit of completion of work Reg. class |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Providing Contractual Labour (Mazdoor), Driver and Office Assistant **Associate Dean and Princpal** College of Agriculture ,Golegaon , Vasantrao Naik Marathwada Agricultural University, Parbhani - 431 402 (M.S.) | - | 40,000 | 2,000 | 12 months Registered Contractor |

### TENDER SCHEDULE as per Tender

**Note:**

1. All eligible/interested tenderers are to be enrolled on portal https://maharashtra.etenders.in before downloading tender documents and participate in e-tendering.
2. Bidder can contact Help Desk for any clarification of their doubts regarding tne process of Electronic Tendering System. Help Desk at through Email ID eproc.support@maharashtra.gov.in
3. Tenders should submit the document related to tender online.
4. Other instructions can be seen in the tender form. All or any one of the tender may be rejected by the Associate Dean & Principal, College of Agriculture, Golegaon if not as per terms and conditions outlined or any other reasons.
5. The related rules and regulations of Marathwada Agricultural Universities Act 1983, Marathwada Agricultural University Statutes 1990 and Account Code 1991 are applicable to the concerned. These documents are available on MKV website http://mkv2.mah.nic.in.
6. The Electronic tendering system for Vasantrao Naik Marathwada Krishi Vidyapeeth, Parbhani of Government of Maharashtra will be available on separate Portal with URL https://maharashtra.etenders.in.
7. For any technical failure Associate Dean & Principal, College of Agriculture ~~Parbhani~~ Golegaon will not be responsible.

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी**
**कृषि महाविद्यालय,गोळेगाव ता.औंढा (नागनाथ),**
**जि.हिंगोली, पिन कोड ४३१७०५**

---

## जाहीर संक्षिप्त ई-निविदा सुचना

कृषि महाविद्यालय,गोळेगाव ता.औंढा जि.हिंगोली अंतर्गत कार्यालयीन कामे करण्यासाठी वेटस्विपर, कार्यालयीन मदतनीस, वाहन चालक, शेतमजूराकडून उद्यान विद्या विभागातील प्रक्षेत्रावरील दैनंदिन नित्याची कामे कंत्राटी पध्दतीने करून घेण्यासाठी ई-निविदा सुचना दिनांक ०१.०९.२०२२ ते ३१.०८.२०२३ पर्यंत (१२ महिने) https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्याचे अवलोकन करुन ई-निविदा सुचनातील तपशीलाप्रमाणे इच्छुक नोंदणीकृत संस्था/गुत्तेदार यांचेकडुन अ' आणि ब' या दोन लिफाफ्यात ई-निविदा दर मागविण्यात येत आहेत.

ई-निविदा फॉर्म व निविदेच्या सविस्तर नियम/अटी/शर्ती उपरोक्त संकेत स्थळावर पाहाता येतील. त्याचे अवलोकन करुन उचित कार्यवाही करावी.

अध्यक्ष ई-निविदा समिती
तथा सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य,
कृषि महाविद्यालय,गोळेगाव

# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी
## कृषि महाविद्यालय,गोळेगाव ता.औंढा (नागनाथ),
## जि.हिंगोली, पिन कोड ४३१७०५

---

**ई-टेंडर नियम व अटी**

१. नोंदणीकृत मजूर पुरवठादार संस्था/कंत्राटदार यांनी स्वतःची अधिकृत डिएससी (डिजीटल सिग्नीचर सर्टिफिकेट) प्राप्त करून घेउन https:// mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करूनच ई-निविदा सादर करावी.

२. सबंधित निविदा धारकांनी त्याचे नोंदणीसंबधीची आवश्यक त्या बाबी व सर्व कागदपत्रे ऑनलाईन प्रणालीव्दारे पीडीएफ स्वरूपात अपलोड करावीत.

३. कंत्राटी मजूरांच्या कामाचा कालावधी दिनांक ०१ सप्टेंबर २०२२ ते ३१ ऑगस्ट २०२३ (३६५ दिवस) प्रर्यंत राहील. व कामाच्या दिवसी मजूरांना कार्यालयीन वेळेत पुर्णवेळ काम करावे लागेल.

४. कामगार कायदयानूसार मजूरांना साप्ताहिक सुटटी दयावी लागेल. मजूरांनी काम केलेल्या दिवसाचाच पगार अनूज्ञेय राहील.

५. निविदा फिस रु. २,०००/- (अक्षरी रुपये दोन हजार केवळ) (Non Refundable) व अनामत रक्कम **रु. ४०,०००/-** (अक्षरी रुपये चाळीस हजार केवळ) (Refundable) ही ई-पेमेंट मार्फत नेट बँकिंग RTGS/NEFT/Debit Card/Credit Card द्वारेच सादर करणे आवश्यक आहे. नसता निविदा रद्द करण्यात येईल.

६. निविदा बयाना रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज अथवा विलंब आकार दिला जाणार नाही.

७. निविदा धारकांने निविदापत्रक स्पष्ट सुवाच्च व सही शिक्यासहीत स्कॅनकरुन अपलोड करावेत.

८. प्राप्त ई-निविदापैकी कोणतीही ई-निविदा अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकारांनी राखून ठेवला आहे. याबाबत कोणत्याही व्यक्तीला अथवा संस्थेला ई-निविदा फेटाळल्याबाबत स्पष्टीकरण मागता येणार नाही.

९. शेवटच्या दिवसी ई-निविदा भरतांना कोणतीही तांत्रीक अडचण आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार असणार नाही.

१०.कंत्राटदारांची ई-टेंडीरीग बाबत काही शंका/ अडचणी / माहीती आवश्यक असल्यास Help Desk or through Email ID eproc.support @ mahatenders.gov.in द्वारे संपर्क साधावा

११. वित्तिय लिफाफा उघडण्याच्या वेळापत्रकात दिलेली वेळ व दिनांक यामध्ये बदल होउ शकेल.

१२. तांत्रीक व दरपत्रके लिफाफा उघडण्याचे वेळी संबंधीत ई-निविदाधारक किंवा अधिकृत प्रतिनिधींनी दिलेल्या तारखेस व दिलेल्या वेळेस उपस्थित रहाणे आवश्यक आहे. नंतर संबंधीताची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

१३.ई-निविदाधारक संस्था/कंत्राटदारावर कोणत्याही प्रकारचा अपराध/गुन्हा दाखल नाही याबाबत स्वयंघोषीत प्रमाणपत्र दयावे लागेल.

१४.किमाण वेतन कायदयाचे व कामगार कायद्याचे उलंघण होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी संस्था/गुत्तेदार यांची राहील.

१५.पुरवठा करण्यात आलेल्या कामगार व्यक्तींना आवश्यक असलेली सुविधा संबंधीत/कंत्राटदारांनी पुरविणे आवश्यक राहिल.

१६.पुरवठा करण्यात आलेल्या कामगार/व्यक्तीच्या उपस्थितीची आवश्यक ती नोंदवही कामगार काम करीत असलेल्या ठिकाणी संस्था/कंत्राटदारास व्यवस्था करावी लागेल.

१७.The related rules and regulations of Marathwada Agriculture Universities Act 1983.Marathwada Agriculture University status 1990 and account code 1991 are applicable to the concerned These documents are available on VNMKV website www.vnmkv.ac.in.

१८.The electronic tendering system for Vasntrao Naik Marathwada krishi Vidyapeeth Parbhani. of Government of Maharashtra will be available on separate Portal with URL https:// mahatenders.gov.in

## अटी व शर्ती - कायदेशीर बाबींच्या पूर्ततेबाबत (Legal Compliances)

१९. महिना अखेर कामाचे देयक सादर करावे लागेल व त्यानंतर देयकाची रक्कम धनादेशाव्दारे अदा केली जाईल.

२०. कामगार कायदयानूसार आवश्यक त्या सर्व बाबीची पुर्तता संस्था/गुत्तेदारांनी करावी. त्या संदर्भात या कार्यालयावर कुठलीही जबाबदारी राहणार नाही.

२१. उधारी देयक सादर करतेवेळी मागील महिण्याचे मजूरांचे भविष्यनिर्वाह निधी (पीएफ) भरणा पावती सादर करत असलेल्या उधारी देयक सोबत जोडणे बंधनकारक राहिल.

२२. एखादया कामगाराबद्यल कोणतीही तक्रार आल्यास त्याचे जागी त्वरीत दुसरा कामगार पुरवावा लागेल.

२३. बालमजुर प्रतिबंधक कायद्याचे पालन करणे निविदाधारकास बंधनकारक राहील.कामगाराचे वय वर्ष १८ च्या वर असावे. तसेच त्याचे वय ६० वर्षापेक्षा कमी असावे व तो कामास सक्षम असून त्याचे चारित्र्य चांगले असावे.

२४. ज्या निविदाधारक कंत्राटदास ई- निविदा सुटल्यास/मिळाल्यास त्या निविदाधारक कंत्राटदारादास ई-निविदा नियम व अटी/शर्तीचा करारनामा मान्य असल्या बाबत दरपत्रकानूसार शासकिय नियमानूसार विहित क्मितीच्या मुद्रांकशुलकावर ई- निविदा नियम व अटी/शर्ती मान्य असल्याबाबतचे बंधपत्र दयावे लागेल.

२५. निविदा मंजूर झालेल्या कंत्राटदारास सर्व आर्थिक बाबीची व आवश्यक ती कागदपत्रे कार्यालयात तात्काळ जमा करावी लागतील.

२६. ज्या निविदाधारक कंत्राटदारास ई-निविदा सुटल्यास/मिळाल्यास त्या निविदाधारक कंत्राटदारास कार्यारंभ आदेश मिळण्यापुर्वी एकूण रक्कमेच्या ५ टक्के सुरक्षा अनामत रक्कम FDR दिर्घमद्दत ठेवीच्या रूपात मा. निर्येत्रक वनामकृवि परभणी यांच्या नावे सुरक्षाठेव दयावी लागेल. सदर रक्कम कंत्राटीचा कालावधी समाधानकारक
पूर्ण केल्यानंतरच परत केली जाईल. त्यावर कोणतेही व्याज देय असणार नाही.

२७. अटी शर्तीचा भंग झाल्यास, सुरक्षा अनामत रक्कम जप्त करून करारनामा रद्द केला जाईल, तसेच संबंधित कंत्राटदाराचा समावेश काळया यादीत केला जाईल.

२८. मा.अध्यक्ष ई -निविदा समिती तथा सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, कृषि महाविद्यालय गोळेगाव यांना कोणत्याही अटी शर्तीमध्ये वाढ करणे अथवा त्या रद्द करण्याचा अधिकार राहील.

२९. रकमेची अदायगी- कामगाराच्या उपस्थितीचा तपशील आल्यानंतर त्या आधारे त्यांनी दोन दिवसात सविस्तर देयक तीन प्रतीत सादर करावे. त्यामध्ये पगारासह कामगार कायद्यानुसार देयक सादर करावे. कामगारांना कामगार कायद्यानूसार वेतन देणे हे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

३०. भविष्यात कंत्राटी मनुष्यबळाच्या वेतनामध्ये वाढ झाली तरी कंत्राटदाराच्या मंजूर केलेल्या सेवा शुल्कामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ दिली जाणार नाही. सेवा शुल्काची रक्कम ही कंत्राटदाराच्या संपूर्ण कालावधीसाठी एकच राहील.

३१. निविदा उघडण्यात आल्यानंतर दराबाबत वाटाघाटीचे अधिकार ई-निविदा समितीकडे राहतील.

३२. निवीदेमध्ये नमुद केलेल्या अटी व शर्ती निविदा स्विकृत झालेल्या तारखेपासुन अंमलात येतील.

३३. वेळोवेळी निर्गमित होणारे शासकीय आदेश/परिपत्रकाचे काटेकोर पालन करणे संबंधीत निविदाधारकावर बंधनकारक राहील.

३३. कामगारांची एकुण संख्या मध्ये गरजेनुसार बदल होऊ शकेल. व कामाची कार्यालयास गरज असेल त्याप्रमाणे कामगारांना काम देण्यात येईल.

३४. दोन किंवा अधिक सेवा पुरवठादारांचे सेवा शुल्क दर एकसमान आल्यास याबाबत मा. अध्यक्ष ई -निविदा समिती तथा सहयोगी अधिष्टाता व प्राचार्य, कृषि महाविद्यालय गोळेगाव यांचा निर्णय अंतिम राहील.

## अटी व शर्ती - दायित्व व नियंत्रण (Liability & Control)

३५. कार्यालयाचे कामकाज सुट्टीच्या दिवशी गरजेप्रमाणे चालू शकते. त्यानुसार कामगारांना उपस्थित राहावे लागेल.

३६. प्रत्येक कंत्राटी कामगारास लेबर ॲक्ट नमुन्याप्रमाणे ओळखपत्र देणे बंधन कारक असुन प्रत्येक कामगाराला कामाच्या दिवशी सदरील ओळखपत्र असणे गरजेचे आहे.

३७. **कंत्राटी कामगारास काम करतेवेळी इजा, अपघात अथवा मृत्यु संभवल्यास किंवा नैसर्गिक आपत्ती उदा. विज, पाऊस, भुकंप वादळामुळे इजा अपघात संभविल्यास त्याची सर्व भरपाई व इतर कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची**

**राहील.पुरविण्यात येणाऱ्या कामगाराचा रक्कम रू. ५.०० लाख इतका सामुहीक अपघाती विमा कंत्राटदाराने उतरविणे बंधनकारक राहील.**

३८. कंत्राटदार निश्चित झाल्यानंतर त्यांनी संबंधीत कामगाराची यादी व पात्रतेच्या कागदपत्रांच्या प्रती कार्यालयास सादर कराव्यात त्यांनतर संबंधीत उमेदवारांची पात्रता व योग्यतेची खात्री कार्यालयामार्फत झाल्यानंतर त्यांना कामावर रूजु करून घेण्यात येईल. अपात्र किंवा असक्षम उमेदवारांना नाकारण्याचा अधिकार मा. अध्यक्ष ई -निविदा समिती तथा सहयोगी अधिष्टाता व प्राचार्य, कृषि महाविद्यालय गोळेगाव यांना राहील.

३९. कार्यालयास आवश्यक असलेल्या कामगार संख्येनुसार मनुष्यबळ पुरवठा करणे कंत्राटदारास आवश्यक राहील.

४० .निविदा कालावधीच्या दरम्यान कंत्राटदाराचा पत्ता किंवा संपर्क दूरध्वनी क्रमांक बदलल्यास त्याची लेखी सूचना या कार्यालयास देणे बंधनकारक राहील.

४१. नेमणूक केलेल्या कामगाराने या कार्यालयाच्या स्थावर व जंगम मालमत्तेचे नुकसान किंवा चोरी केल्यास त्याची नुकसान भरपाईपोटी देय होणारी रक्कम कंत्राटदार/संस्थाच्या सुरक्षा ठेवीतून अथवा मासिक देयकातून परस्पर कापून घेण्यात येईल.

४२. कंत्राटदार/संस्थाकडून पुरविण्यात आलेल्या कामगारानी कार्यालयीन शिस्तीचे पालन करणे बंधनकारक असून, शिस्तीचे पालन करतात की नाही, याची देखरेख करण्याचे काम कंत्राटदाराचे राहील.

४३. ई-निविदेव्दारे कंत्राटदारास कामाचे वाटप झाल्यानंतर सरकारी कामगार आयूक्त नांदेड यांच्याकडून निर्गमित होणारी अनूज्ञापती एक महिण्याच्या आत सादर करण्याची हमी रू.१००/-च्या बंधपत्रावर शपथपत्र देणे बंधनकारक.

## अटी व शर्ती - कायदेशीर बाबींच्या पूर्ततेबाबत (Legal Compliances)

४४. कंत्राटदारास कंत्राट मिळाल्यानंतर दर महिन्याचे वेतन पारीत झाल्यानंतर भविष्यनिर्वाह निधी, ई.एस.आय. व व्यवसाय कर ईत्यादी बाबी कामगार कायद्यानूसार संबंधीत कामगार यांच्या खात्यावर भरण्यासाठी संबंधीत कंत्राटदारावर बंधनकारक राहील. सदरच्या रकमा कंत्राटदाराने कोणत्याही परिस्थितीत दोन आठवडयाच्या आत संबंधीत खात्यावर भराव्यात व भरणा केल्याचा सविस्तर तपशील (इएसआर) संबंधीत कामगार खात्याच्या स्टेटमेंटसह भरणा केल्याची खात्री करण्यासाठी अनुषंगीक कागदपत्रांसह पुढील महिन्याच्या बिलासह सादर करावा. सदरचा तपशील पुढील महिन्याच्या बिलासह सादर न झाल्यास बिलाची आदायगी केली जाणार नाही व त्यामुळे उद्भवणा-या अडचणींना कंत्राटदारास जबाबदार धरण्यात येईल. अशा परिस्थीतीत अध्यक्ष ई -निविदा समिती तथा सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य कृ षि महाविद्यालय गोळेगाव यांचा निर्णय अंतिम असेल.

४५. मा.नियंत्रक वनामकृवि परभणी यांचे परीपत्रक क्रं.सीएफई/आस्था/४४४/२०२२ दिनांक २१/०२/२०२२ अन्वये किमान वेतन कायद्यातील तरतुदी नुसारच किमान वेतन, विशेष वेतन, कर्मचारी पेन्शन अंशदान, भनिनि मालक अंशदान, निक्षेप सहबध्द विमानिधी, प्रशासन निधी, एकून किमान वेतन भनिनि ,कमिशन आदी सर्व बाबी विचारात घेवून किमान वेतन कायद्यातील तरतुदी नुसारच वेतन देणे बंधनकारक असेल. तसेच **प्रचलित नियमानुसार लागू होणारा CGST व SGST सह दरपत्रके सादर करावीत.**

४६. किमाण वेतण कायदयाच्या अधिन राहुन दर दर्शवावे. किमाण वेतण कायदयाच्या कमी अथवा शुन्य दर दर्शविल्यास निविदा रद् करण्यात येईल.

४७. कंत्राटदाराने नेमलेल्या कामगारांच्या वेतनाबाबत कंत्राटी कामगार कायदा व कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा यामधील तरतूदीचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. या बाबतीत काही तंटा निर्माण झाल्यास त्यास अध्यक्ष ई-निविदा समिती तथा सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य कृ षि महाविद्यालय गोळेगाव यांचा निर्णय बंधनकारक असेल.

४८. कंत्राटदाराने कामगारास अदा केलेल्या दरमहा भविष्य निर्वाह निधी, गट विमा पावती व वेतन चिठ्ठी याचा तपशील व हजेरी कार्ड दरमहा देणे बंधनकारक राहील.

४९ . कंत्राटदाराने महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटी कामगार वेतन कायद्यानुसार आवश्यक ते सर्व अभिलेखे (हजेरी नोंद, वेतन वाटप नोंद, दैनंदिन कामाची नोंद इत्यादी रजिस्टर ठेवावेत व ते संबंधीत अधिकाऱ्यांच्या तपासणी वेळेस हजर करून तपासुन घेणे बंधनकारक राहील.

५०. शासकीय कामगार कायद्यानुसार शासनाने वेळोवेळी ठरवृन दिलेल्या सर्व नियमांची पुर्तता करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

५१. कराराचे संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास, सदरचा वाद स्थानिक जिल्हा न्यायालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये सोडविणे बंधनकारक राहील.

५२. कंत्राटदाराने पुरवठा केलेल्या सर्व कंत्राटी कामगारांचे खाते राष्ट्रीयकृत बँक शाखा या एकाच शाखेत उघडावे.

५३. निवीदा धारकाने सादर केलेली निविदा नामंजूर झाल्यास, त्याची बयाना रक्कम जास्तीत जास्त दोन महिन्यांच्या आत परत करण्यात येईल. सदर रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

५४. कंत्राटदाराने त्याच्या बिलाचा मोबदला धनादेशाद्वारे मिळताच कंत्राटी मजुरांच्या निव्वळ वेतनाच्या एकत्रितरित्या असलेला धनादेश बँकेत जमा करावा. म्हणजे पर्यायाने सर्व कंत्राटी कर्मचा-यांचे वेतन अदायगी त्यांच्या खात्यावर त्वरीत होइल.

५५. समान निविदा असल्यास त्याचवेळी उभयतांसी चर्चाअंती या बाबत अध्यक्ष ई-निविदा समिती तथा सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य कृ षि महाविद्यालय गोळेगाव हे निर्णय घेतील. व तो निर्णय अंतिम राहील.

५६. कोणतीही निविदा पुर्णपणे किंवा अंशतः स्विकारणे अथवा नाकारणेचे अधिकार अध्यक्ष ई-निविदा समिती तथा सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य कृषि महाविद्यालय गोळेगाव यांनी राखुन ठेवलेला आहे.

५७. कामाचा आदेश मिळाल्यानंतर काम करण्यास असमर्थ ठरल्यास त्या कंत्राटदाराची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल व दुसऱ्या क्रमांकाच्या निविदा धारकाने प्रथम क्रमांकाच्या लघुत्तम निविदाधारकाने दिलेल्या दराने काम करण्याची समर्थता दर्शविल्यास काम देण्याचे हक्क ई-निविदा समितीस राहातील तसेच दुसऱ्या क्रमांकाच्या निविदा धारकाने असमर्थता दर्शविल्यास तिसऱ्या क्रमांकाच्या निविदा धारकाने प्रथम क्रमांकाच्या लघुत्तम निविदा धारकाच्या दराने काम करण्यास समर्थता दर्शविल्यास त्यास काम मंजुर करण्याचा अधिकार निविदा समितीस राहील.

५८. कंत्राटदार/संस्थ्याच्या मासिक देयकातून नियमानुसार टी.डी.एस. प्राप्तीकराची वजावट करण्यात येईल व तसे प्रमाणपत्र देण्यात येईल, याबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष ई-निविदा समिती तथा सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य कृ षि महाविद्यालय गोळेगाव यांनी राखून ठेवले आहेत.

**लिफाफा अ, मध्ये सादर करावयाची कागदपत्रे (स्वयंसाक्षांकित सत्यप्रती).**

१. मा.कामगार अधिकारी यांचेकडून प्राप्त चालू वर्षाचा संस्था (Shop Act Registration) नोंदणी परवाना.
२. मा.कामगार आयुक्त यांचे मजूर पुरवठा प्रमाणपत्र. (निविदा भरतेवेळी वैध असावे.)
३. शासकिय/निमशासकिय/कार्यालयात/संस्था यांना अशा प्रकारचे काम/सेवा पुरविल्या बाबतचे किमान ०३ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र.
४. ई-निविदाधारकाचे कोणत्याही शासकिय/निमशासकिय/महामंडळाच्या काळया् यादीत नाव समाविष्ट नसल्याचे लेटर हेडवर स्वयंघोशित प्रमाणपत्र.
५. ई-निविदा समितीने निश्चित केलेल्या नियम व अटी/शर्ती मान्य असल्या बाबतचे लेटर हेडवर प्रमाण पत्र.
६. व्यवसाय कर (PROFESSIONSL TAX) नोंदणी प्रमाणपत्र.
७. व्यवसाय कर भरणा केल्याचे मागील दोन वर्षाचे चालान/प्रमाणपत्र.
८. मागील तीन वर्षाचा आयकर भरणा केल्याचे रिटर्न व सनदी लेखापाल यांचा ऑडीट रिपोर्ट
९. मागील तीन महिन्याचा ( GST) भरणा केल्याचे रिटर्न/पावत्या.
१०. कर्मचारी/कामगार राज्य विमा नोंदणी प्रमाणपत्र
११. वस्तू व सेवा कर ( GST) नोंदणी प्रमाणपत्र.
१२. भविष्य निर्वाह निधी ( PF) नोंदणी प्रमाणपत्र
१०. वैयक्तीक/फर्मच्या पॅनकार्डची छायांकित प्रत.
११. वैयक्तीक/फर्मच्या आधार कार्डची छायांकित प्रत.

**लिफाफा (ब) मध्ये सादर करावयाची कागद पत्रे.**

भरलेली निविदा.

**टिपः** लिफाफ्यात ब, मध्ये दर सर्व करासहित भरणे बंधनकारक आहे. नसता ई-निविदा रद्द करण्यात येईल.

अध्यक्ष ई-निविदा समिती
तथा सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य,
कृषि महाविद्यालय गोळेगाव